ePaper
मी मुख्यमंत्री झाले तर... अमृता फडणवीसांनी सांगितलं मनातलं स्वप्न!

| वर्ष - 9 | अंक -91 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 24 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत


- लिव्हरपूलची पराभवाची मालिका कायम
- दुसऱ्यांदा भारतीय महिला अंतिम फेरीत
- सुरक्षा परिषदेत सुधारणांची गरज
- एसआयआर सुधारणा नसून जुलूम


स्वराज्य संस्थां निवडणूक रणधुमाळी | गाफील राहू नका! - राज ठाकरे

# “रात्र वैऱ्याची आहे..!

## ठाकरे बंधूंची जवळीक वाढली, पण ‘राज’ निर्णयाने मनसैनिक पुन्हा निराश



। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक रणधुमाळीला वेग आला असून अनेक ठिकाणी बिनविरोध उमेदवारांची निवड होत असल्याने विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका सुरू केली आहे. अशातच मुंबई महापालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंची जवळीक वाढल्याची राजकीय चर्चा सुरू आहे. या घडामोडींमुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला होता. मात्र, अचानक राज ठाकरे यांनी नगरपरिषद निवडणुका न लढवण्याचा निर्णय जाहीर करताच पुन्हा एकदा इच्छुकांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे.रात्र वैऱ्याची आहे... गाफील राहू नका! मतदार याद्यांमध्ये काय सुरू आहे, त्यावर लक्ष ठेवा. खरे मतदार आहेत की खोटे, हे तपासा.”, असे राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना सज्जड दम भरला आहे.**

### मुंबई मनपा निवडणुकीवरून महाविकास आघाडीत मतभेद

मुंबई महापालिकेत मनसेला सोबत घेण्यावरून महाविकास आघाडीत मतभेद उफाळून आले आहेत. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी मनसेसोबत जाण्यास स्पष्ट नकार दिला. मात्र त्याचवेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी “भाजपला हरवण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे,” असे विधान करून वेगळी दिशा दाखवली.

याच दरम्यान शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत मुंबईतील काही पदाधिकाऱ्यांनी मनसेला सोबत घेण्याची तयारी दर्शवली. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये मनसेच्या प्रवेशाला भिंत आहे की दार — हे अद्याप स्पष्ट नाही.

### मनसे इच्छुकांना धक्का : “पुन्हा का मागे हटले राज?”

मनसेला पहिली सत्ता नाशिक महापालिकेत मिळाल्यापासून स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास कायम दिसून येत होता. यावेळीही अनेक इच्छुकांनी मुलाखती दिल्या आणि रणनिती ठरवण्यासाठी बैठका झाल्या. पण राज ठाकरे यांच्या आदेशामुळे मनसे नगरपरिषद निवडणूक लढवणार नाही, हा निर्णय कार्यकर्त्यांना धक्का देणारा ठरला. राजकीय वर्तुळात आता हा प्रश्न गाजत आहे:

### “पराभव टाळण्यासाठी निवडणूक टाळणे ही रणनीती की गोंधळ?”

मनसेच्या आतल्या अनेक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत म्हटले — “आम्ही वर्षानुवर्षे मैदानात आहोत, मग प्रत्येक वेळेस निर्णय शेवटच्या क्षणी का बदलतो?”

### राज ठाकरे आक्रमक सत्ताधारी व निवडणूक आयोगावर निशाणा

मुंबईत आयोजित कोकण महोत्सवात बोलताना राज ठाकरे यांनी अत्यंत गंभीर भूमिका मांडली. मतदार याद्यांतील गोंधळ, नावांची चोरी आणि राजकीय हस्तक्षेपावर त्यांनी सविस्तर टीका केली.

**राज ठाकरे म्हणाले:**

मतदार याद्यांमध्ये काय सुरू आहे, त्यावर लक्ष ठेवा. खरे मतदार आहेत की खोटे, हे तपासा.”

लोकसभा आणि राज्यातील अलीकडील निवडणुकांत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे गायब झाल्याचा आरोप विरोधकांकडून वारंवार करण्यात येतो आहे, त्यावर राज यांनी पुन्हा एकदा हल्ला चढवला.

### राज यांनी चेतावणी दिली

“ही मुंबई महानगरपालिका आपल्यासाठी शेवटची लढाई असू शकते. जर गाफील राहिलो तर महानगरपालिका कायमस्वरूपी हातातून जाईल.”

### मनसे–शिवसेना ठाकरे गट युतीची चर्चा जोरात

मुंबईत निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे मनसे आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्यातील युतीची चर्चा तापत चालली आहे. जागावाटपावर संवाद सुरू असल्याचे सूत्रांचे मत आहे. मात्र या युतीला काँग्रेसने विरोध दर्शविल्याने महाविकास आघाडी पुन्हा संभ्रमात आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी (शरद पवार गट) मात्र मनसेसोबत येण्यास तयार असल्याचे संकेत आहेत.

### पुढे काय? — राजकारणात ‘अनिश्चितता’ कायम

स्थानिक स्वराज्य निवडणुका सुरू आहेत, नगरपरिषदांनंतर महापालिका निवडणुका
मुंबई मनपेसाठी सर्व पक्षांचे गणित सुरू

## ऐतिहासिक निवडणूक ठरणार

ठाकरे बंधूंच्या वाढत्या संपर्कामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात उत्सुकता वाढली असली, तरी नगरपरिषद निवडणुका न लढवण्याच्या राज ठाकरे यांच्या निर्णयाने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम, निराशा आणि अपेक्षेचे नवीन वलय तयार झाले आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणूक ही फक्त राजकीय सत्ता नसेल — तर “मराठी अस्मिता की गठबंधन गणित?” याचे उत्तर शोधणारी ऐतिहासिक निवडणूक ठरणार आहे.

- महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या रणनीतीवर प्रश्नचिन्ह
- मनसे नगरपरिषद निवडणूक लढवणार नाही इच्छुकांचा भ्रमनिरास
- महाविकास आघाडीत मनसेला घेण्यावरून नव्या राजकीय भूचालाची चिन्हे
- राज ठाकरे यांचे सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल—“रात्र वैऱ्याची आहे, जागे राहा!”
- मुंबईमध्ये मनसे–उद्धव सेना युतीची शक्यता काँग्रेस मात्र नाराज

बिबट्यांच्या दहशतीमुळे नागरिक त्रस्त

## औंध भागात बिबट्या दिसल्याचा दावा

# जिल्ह्यानंतर आता शहरामध्ये बिबट्या?

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यात बिबट्यांच्या दहशतीमुळे नागरिक त्रस्त असतानाच, आता शहरातही बिबट्याचा वावर असल्याचा दावा केला जात आहे. औंध भागातील रहिवाशांना रविवारी पहाटे चारच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याने भीतीचे वातावरण आहे. मात्र, त्यानंतर बिबट्या कोणत्याही ठिकाणी दिसून आलेला नाही. तरीदेखील, वन विभाग आणि रेस्क्यू संस्थेचे कार्यकर्ते पूर्ण दक्षतेने सर्व शक्यता पडताळून पहात आहेत. थर्मल ड्रोनसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परिसराची काटेकोर तपासणी सुरू आहे. तरी नागरिकांनी सतर्क रहावे. परंतु, घाबरून जाऊ नये, असे आवाहन वन विभागाने केले आहे.**

## नागरिकांनी सतर्क रहावे






औंध भागातील सिंध सोसायटी परिसरात त्याचप्रमाणे ब्रेमेन चौकात पहाटे चारच्या सुमारास बिबट्या दिसल्याचे परिसरातील रहिवाशांनी सांगितले. बिबट्या आल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणामध्ये स्पष्टपणे दिसत आहे. बिबट्याच्या हालचालीच्या पार्श्वभूमीवर पुणे वन विभाग आणि रेस्क्यू संस्थेचे कार्यकर्ते घटनास्थळी उपस्थित राहून शोध मोहीम राबवत आहेत. थर्मल ड्रोनसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परिसराची काटेकोर तपासणी सुरू आहे. पुणे वन विभागाच्या वतीने रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम सुरू होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, औंध, बाणेर, चतु:श्रृंगी परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.'पहाटे चारनंतर बिबट्या कोणत्याही ठिकाणी विश्वसनीय पुराव्यासह दिसून आलेला नाही. तरीदेखील, वन विभाग पूर्ण दक्षतेने सर्व शक्यता पडताळून पाहत आहे', 'नागरिकांनी सतर्क रहावे. परंतु घाबरून जाण्याचे कारण नाही.

कोणतीही अफवा पसरवू नये किंवा न पडताळलेली माहिती समाजमाध्यमांवर प्रसारित करू नये. संशयास्पद हालचाल किंवा बिबट्यासंदर्भातील कोणतीही माहिती आढळल्यास तात्काळ १९२६ हेल्पलाइनवर संपर्क साधावा,' असे आवाहन पुणे वन विभागाने केले आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळेच ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबवता येईल, असा विश्वास पुणे वन विभाग व्यक्त केला.काही वर्षांपूर्वी शहरातील वर्दळीचा भाग असलेल्या कर्वे रस्त्यावरील नळ स्टॉप चौक येथील चर्चच्या आवारामध्ये बिबट्या आल्याने खळबळ उडाली होती. त्यानंतर रविवारी

## परिसराची काटेकोर तपासणी सुरू

थर्मल ड्रोनसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परिसराची काटेकोर तपासणी सुरू आहे. पुणे वन विभागाच्या वतीने रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम सुरू होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, औंध, बाणेर, चतु:श्रृंगी परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.'पहाटे चारनंतर बिबट्या कोणत्याही ठिकाणी विश्वसनीय पुराव्यासह दिसून आलेला नाही. तरीदेखील, वन विभाग पूर्ण दक्षतेने सर्व शक्यता पडताळून पाहत आहे.

औंध परिसरातील रहिवाशांना बिबट्याचे दर्शन घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नागरिकांनी आपले श्वान मोकळ्या ठिकाणी सोडू नयेत. पहाटे शौचास जाणाऱ्या नागरिकांनी काळजी घ्यावी. आम्ही बिबट्याचा शोध घेत आहोत. थर्मल ड्रोनच्या माध्यमातून बिबट्याची शोध मोहीम सुरू आहे. जिल्ह्यात बिबट्यांच्या दहशतीमुळे नागरिक त्रस्त असतानाच, आता शहरातही बिबट्याचा वावर असल्याचा दावा केला जात आहे. औंध भागातील रहिवाशांना रविवारी पहाटे चारच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याने भीतीचे वातावरण आहे. मात्र, त्यानंतर बिबट्या कोणत्याही ठिकाणी दिसून आलेला नाही. तरीदेखील, वन विभाग आणि रेस्क्यू संस्थेचे कार्यकर्ते पूर्ण दक्षतेने सर्व शक्यता पडताळून पहात आहेत. थर्मल ड्रोनसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून परिसराची काटेकोर तपासणी सुरू आहे. तरी नागरिकांनी सतर्क रहावे. परंतु, घाबरून जाऊ नये, असे आवाहन वन विभागाने केले आहे. औंध भागातील सिंध सोसायटी परिसरात त्याचप्रमाणे ब्रेमेन चौकात पहाटे चारच्या सुमारास बिबट्या दिसल्याचे परिसरातील रहिवाशांनी सांगितले. बिबट्या आल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणामध्ये स्पष्टपणे दिसत आहे. बिबट्याच्या हालचालीच्या पार्श्वभूमीवर पुणे वन विभाग आणि रेस्क्यू संस्थेचे कार्यकर्ते घटनास्थळी उपस्थित राहून शोध मोहीम राबवत आहेत.

# अपघात रोखण्यासाठी वाहतूक विभागाचा मोठा निर्णय

## मंगळवारपासून नवे नियम लागू; वाहनचालक चिंतेत

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील कात्रज-देहूरोड बायपासवरील नवले पुलाजवळ वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. २५ नोव्हेंबरपासून भूमकर चौक ते नवले पूल चौक या मार्गावरील वाहनांसाठीची वेगमर्यादा ताशी ६० किलोमीटरवरून थेट ताशी ३० किलोमीटर इतकी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्याची अपेक्षा असली तरी, वाहनचालक आणि ट्रान्सपोर्ट असोसिएशनमध्ये याबाबत चिंता वाढली आहे.**



काही दिवसांपूर्वीच याच परिसरात झालेल्या एका भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेने संपूर्ण पुणे हादरले होते. यानंतर पोलिसांनी तातडीने सुरक्षा उपाययोजना राबवत नवा नियम लागू करण्याचा निर्णय घेतला. या रस्त्याचा उतार तीव्र असून, सततची जड वाहतूक असल्याने हा भाग 'अपघातप्रवण झोन' म्हणून ओळखला जातो.

**वेगमर्यादा उल्लंघनावर कारवाई**

वाहतूक पोलिसांनी सांगितले की, नव्या वेगमर्यादेनंतर नियम तोडणाऱ्यांवर सीसीटीव्ही फुटेज आणि स्पीड गनच्या मदतीने कठोर कारवाई केली जाणार आहे. सर्व वाहनांवर — कार, दुचाकी, ट्रक, ट्रेलर — समान नियम लागू राहणार आहेत.

**वाहनचालकांकडून चिंता व्यक्त**

नव्या नियमामुळे वाहतूक सुरक्षित होईल अशी अपेक्षा असली तरी चालक आणि वाहतूक संघटनांकडून वेगळ्याच चिंता समोर येत आहेत. ताशी ३० किमी इतका कमी वेग ठेवताना वारंवार ब्रेक लागणार असल्याने ब्रेक गरम होणे, निकामी होणे आणि वाहनांवरील नियंत्रण सुटण्याची शक्यता वाढेल, असे मत परिवहन क्षेत्रातून व्यक्त केले जात आहे.

वाहतूकदार महासंघाचे वरिष्ठ पदाधिकारी डॉ. बाबा शिंदे म्हणाले,

"रस्ता उताराचा असल्याने मोठी वाहने चालवताना ताशी ३० किमीचा वेग राखणे तांत्रिकदृष्ट्या कठीण आहे. अचानक ब्रेक लावल्याने अपघाताची शक्यता वाढू शकते. त्यामुळे दीर्घकालीन अभियांत्रिकी बदल आणि पर्यायी ट्रॅफिक व्यवस्थापनाची गरज आहे."

## पोलिसांचे स्पष्टीकरण

या निर्णयाबाबत अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी प्रतिक्रिया दिली असून त्यांनी स्पष्ट केले की, तीव्र उताराच्या भागात नाही तर शहराच्या जोडणाऱ्या मार्गावर ही वेगमर्यादा लागू होणार आहे. "नवले पूल परिसरातील वाहतूक शिस्तबद्ध करण्यासाठी वेगमर्यादा बदल आवश्यक होती. भविष्यात सेवा रस्ते आणि आवश्यक संरचना उभारल्यानंतर नियमांमध्ये बदल करता येऊ शकतील. वाहनचालकांनी सूचना व सूचना फलकांचे पालन करावे, अडचणी असल्यास सांगाव्यात," असे पाटील म्हणाले.

**आताचे नियम तात्पुरते की कायम?**

या बदलांमुळे रस्त्यावर अपघात कमी होतील की वाहतूक कोंडी आणि तांत्रिक अडचणी वाढतील — हा मोठा प्रश्न नागरिक आणि प्रशासनासमोर उभा आहे. पुढील काही दिवसांत या निर्णयाचा प्रत्यक्ष परिणाम दिसेल आणि त्यानंतरच वेगमर्यादा कायम ठेवायची की बदलायची यावर प्रशासन निर्णय घेऊ शकते.

एकीकडे अपघात टाळण्यासाठी कडक नियम लागू होत असताना, दुसरीकडे वाहनचालकांच्या अडचणीही प्रकर्षाने समोर येत आहेत.

## 'रेकॉर्ड ब्रेक" गर्दी : तब्बल 79 हजार पर्यावरण प्रेमींच्या साक्षीने

# ऐतिहासिक "रिव्हर सायक्लोथॉन"!

### इंद्रायणी नदी स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी 51 हजार 300 हून अधिक सायकलपटू सहभागी

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंद्रायणी नदी स्वच्छतेचा जागर संदेश देण्यासाठी रविवारी आयोजित करण्यात आलेल्या 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' या भव्य उपक्रमाला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. वारकरी परंपरा आणि पर्यावरणसंवर्धनाचा संगम घडवणाऱ्या या उपक्रमात 'शिव-शंभू यशोगाथा' हा विशेष कार्यक्रम सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. शिवकालीन शौर्य, सांस्कृतिक वैभव आणि नदी संवर्धनाचा संदेश यांचा अनोखा मेळ यंदाच्या सायक्लोथॉनमध्ये पाहायला मिळाला.**





'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'—धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक परिसरातून रविवार, दि. 23 नोव्हेंबर रोजी पहाटे 6 वाजता सायक्लोथॉनची सुरुवात झाली. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी आयोजित होणाऱ्या या उपक्रमाने यंदा नवा इतिहास रचला. यंदा सायक्लोथॉनचे 9 वे वर्ष होते. रणमर्द शिलेदारांचे संचलन, मर्दानी खेळ, ढोल-ताशांचा गजर आणि मशाल-दिवटी नृत्य यांच्या सादरीकरणांनी शिवराज्यकालीन पराक्रमाची जिवंत झलक उपस्थितांना अनुभवता आली. शिव-शंभू गर्जनेने परिसर दणाणून गेला.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, धनश्री हॉस्पिटलच्या संचालक यांच्यासह विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही ऐतिहासिक सायक्लोथॉन संपन्न झाली. जगातील सर्वात उंच 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' छत्रपती संभाजी महाराजांना मानाचा मुजरा देण्यासाठी हजारोंच्या संख्येने शिवप्रेमी, सायकलपटू व नागरिक आवर्जून हजर होते. 'शिव-शंभू यशोगाथा' हा कार्यक्रम उपक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

**'एआय काउंटिंग सिस्टम'ने दर्शवला विक्रमी सहभाग**

सायक्लोथॉनमध्ये 38 हजार सायकलपटूंनी प्रत्यक्ष ऑनलाईन नोंदणी केली होती. WTE फाउंडेशनद्वारे वापरलेल्या अत्याधुनिक एआय काउंटिंग सिस्टममुळे प्रत्यक्ष उपस्थितीचे आकडे अधिक प्रभावी ठरले. संगणक दृष्टी आणि 'डीप लर्निंग' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्राप्त अहवालानुसार, 51 हजार 300 पेक्षा अधिक सायकली आणि 78 हजार 900 च्या जवळपास नागरिक या उपक्रमाला उपस्थित होते. नोंदणी व्यतिरिक्त बहुसंख्य सायकलपटू सहभागी झाले, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. सायक्लोथॉनच्या आयोजनामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर यांनी सर्वोतोपरी पुढाकार घेतला. पिंपरी-चिंचवड पोलीस यासह विविध शासकीय विभाग आणि शाळा-महाविद्यालयांनी हा उपक्रम यशस्वी केला, त्या सर्वांचे आभार व्यक्त करतो, अशी भावना मुख्य समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.

**तीन ट्रॅक, हजारोंचा सहभाग...**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान संस्था, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सायक्लोथॉनमध्ये 5, 15 आणि 25 किमी अशा तीन ट्रॅकवर हजारोंनी सहभाग नोंदवला. अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे म्हणाले, "शिव-शंभू यशोगाथा ही केवळ सादरीकरणांची मालिका नसून आपला इतिहास आणि संस्कृती जपण्याची प्रेरणा आहे. हीच प्रेरणा निसर्गसंवर्धनाच्या कार्यात अधिक लोकांना जोडेल."



"इंद्रायणी ही आपल्या संस्कृतीची जीवनधारा आहे. तिच्या स्वच्छतेसाठी मतभेद विसरुन सर्वांनी एकत्र येणं ही काळाची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला मान्यता दिली. हे या उपक्रमाचे यश आहे. 79 हजारांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून नदी संवर्धनाचा लढा अधिक बळकट होईल. तमाम पिंपरी-चिंचवडकर, सोसायटी फेडरेशन आणि विविध स्वंयसेवी-संघटनांच्या सहभागामुळे ही विश्वविक्रमी सायक्लोथॉन यशस्वी होत आहे. यावर्षीची सायक्लोथॉन 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला समर्पित केली आहे. हजारो सायकलपटूंनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच स्मारकाला मानवंदना दिली. स्मारकाच्या उभारणीसाठी आम्हाला संघर्ष करावा लागला, अनेक आरोप झाले. आगामी काळात कोणताही आरोप सहन केला जाणार नाही. शहरासाठी शिव-शंभूंच्या कार्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करतो.

– **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पिंपरी-चिंचवडमधून पवना, इंद्रायणी आणि मुठा अशा तीन नद्या वाहतात. त्यांचे संवर्धन, जनत आणि सौंदर्यीकरण ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. सायक्लोथॉन हा संयुक्त उपक्रम आहे. याद्वारे नागरिकांनी सायकलचा वापर अधिकाधिक करावा. 'नॉन मोटराईझ व्हेईकल'हा नागरिकांच्या जीवनशैलीचा भाग असावा. सार्वजनिक वाहतूक सुविधांचा वापर करावा. ज्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि शहरासाठी आरोग्यदायी वातावरण निर्माण होईल. पिंपरी-चिंचवड महापालिका अशा उपक्रमांना प्रोत्साहन देत आहे. नदी आणि शहर प्रदूषणमुक्त राहण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. हा देण्यासाठी हा रिव्हर सायक्लोथॉन आयोजित केली जाते. त्याला पिंपरी-चिंचवडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

– **श्रावण हर्डिकर,** प्रभारी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.


भूमिका

# महिला आरक्षणाचे कवित्व

**महिलांसाठी विधिमंडळांमध्ये ३३ टक्के आरक्षणासंबंधीची दुरुस्ती २०२३ मध्येच झाली होती; परंतु देशात पुढील निवडणूक क्षेत्रनिहाय पुनर्रचना (परिसीमन) झाल्यानंतरच ती उच्चस्तरीय विधिमंडळांमध्ये लागू केली जाईल.**

आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के समहिला आरक्षण लागू करण्यात विलंब का होत आहे, याबाबत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करून हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागवले आहे. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा महिला सशक्तीकरणाच्या बाजूने उभे राहत महिलांना देशातील सर्वात मोठा अल्पसंख्याक गट म्हटले. याचे कारण देशाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४८.४ टक्के महिला आहेत; परंतु देशाच्या मुख्य प्रवाहात त्यांचा सहभाग अत्यंत कमी आहे. तसे पाहता महिला आरक्षणासाठीचा कायदा आधीच संमत झाला आहे आणि तो लागू करण्याची जबाबदारी कार्यकारी यंत्रणेवर आहे. महिलांसाठी विधिमंडळांमध्ये ३३ टक्के आरक्षणासंबंधीची दुरुस्ती २०२३ मध्येच झाली होती; परंतु देशात पुढील निवडणूक क्षेत्रनिहाय पुनर्रचना (परिसीमन) झाल्यानंतरच ती उच्चस्तरीय विधिमंडळांमध्ये लागू केली जाईल. मुख्य प्रवाहातील



राजकारणात महिलांचा सहभाग तुलनेने कमी असल्याने महिला सशक्तीकरणाचा पुरस्कार करणाऱ्यांची काळजी समजण्यासारखी आहे. सर्वोच्च न्यायालयाने अशी विचारणा केली आहे की, आरक्षणाशिवाय महिलांना तिकीट का देता येत नाही, हा प्रश्नही राजकीय पक्षांनी विचारात घ्यायला हवा. सध्या लोकसभेत ७५ महिला सदस्य आहेत आणि राज्यसभेत ४२ महिला आहेत; पण अनेक विधानसभांमध्ये महिलांची कमतरता प्रकर्षाने जाणवते. या पार्श्वभूमीवर महिला आरक्षण व्यवस्थेची अंमलबजावणी करण्याच्या बाजूने न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने दाखवलेली सक्रियता प्रशंसनीय आहे. जनहित याचिका आणि न्यायालयीन हस्तक्षेपामुळे सरकार परिसीमनाचे काम कधी पूर्ण करणार आहे, हे स्पष्ट होऊ शकेल. या परिसीमनानंतर भारतीय राजकारणात अनेक बदल होतील आणि त्यातील सर्वात मोठा बदल महिला आरक्षणामुळे होईल. महिलांसाठीचे आरक्षण लागू झाले, तर लोकसभेतील महिला खासदारांची संख्या किमान १७९ होईल. परिसीमनामुळे जागांची संख्या वाढली, तर लोकसभेतील महिलांची संख्या २०० च्या वर जाईल. देशातील महिलावर्ग या दिवसाची आतुरतेने प्रतीक्षा करत आहे. याचे कारण मुख्य प्रवाहातील राजकारणात महिलांचा सहभाग स्वयंस्फूर्तीने वाढविण्याबाबत राजकीय पक्ष सजग नाहीत. आदर्श परिस्थितीत प्रत्येक पक्षाने स्वतःहून किमान ३३ टक्के जागांवर महिलांना तिकीट दिले पाहिजे. तसे झाल्यास स्वतंत्रपणे महिला आरक्षणासाठी कोणत्याही पक्षाला कायदेशीर बंधन घालण्याची गरज उरणार नाही. पण, प्रत्येक पक्ष जिंकू शकणाऱ्या उमेदवारांच्या शोधात असतो आणि अशावेळी महिलांचा दावा कमकुवत ठरतो. एक पैलू हादेखील आहे की, बहुसंख्य महिला प्रस्थापित राजकीय घराण्यांतून येतात. केवळ स्वतःच्या गुणवत्तेवर राजकारणात स्थान निर्माण करणाऱ्या महिलांची संख्या कमी आहे. आरक्षण लागू झाल्यानंतरही घराणेशाही निर्माण होऊ न देणे, हे राजकीय पक्षांचे कर्तव्य आहे. त्यामुळे महिलांना आरक्षण मिळायलाच हवे; पण त्यासाठी आधीच योग्य वातावरण तयार करणेही आवश्यक आहे. केवळ आरक्षण दिल्याने महिलांचे कल्याण होणार नाही. महिलांनाही स्वतःच सक्षमपणे पुढे यावे लागेल. यासाठी महिलांमधील व्यवहार्य जागरूकता सर्वात आवश्यक आहे.महिलांसाठी विधिमंडळांमध्ये ३३ टक्के आरक्षणासंबंधीची दुरुस्ती २०२३ मध्येच झाली होती; परंतु देशात पुढील निवडणूक क्षेत्रनिहाय पुनर्रचना (परिसीमन) झाल्यानंतरच ती उच्चस्तरीय विधिमंडळांमध्ये लागू केली जाईल.आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के समहिला आरक्षण लागू करण्यात विलंब का होत आहे, याबाबत सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करून हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. न्यायालयाने केंद्र सरकारकडून उत्तर मागवले.

## असे कसे ?

### पाणी कसं पोहोचतं?

***साथ पाच-दहा मीटर खोल असलेल्या विहिरीतून पाणी काढायचं तर विजेचा पंप बसवावा लागतो.***

दोन-जीन मजल्यांच्या इमारतीच्या गच्चीवरची टाकी भरायची तरी पंपाच्या मदतीविना ते शक्य होत नाही. मग ताडमाड उंच असलेल्या माडाच्या शेंड्यापर्यंत त्याच्या मुळांशी घातलेलं पाणी कसं पोहोचत? जंगलांमधले देवदारसारखे वृक्ष तर सहज शंभर मीटर उंची गाठतात. त्यांनाही मुळाजवळचं पाणी पुरतं.हे शक्य व्हावं अशी व्यवस्था निसर्गानंच करून ठेवली आहे. निसर्गाच्या दोन करामतींचा यात वाटा आहे. पहिला म्हणजे, या झाडांमध्ये झाथलेम या नावानं ओळखल्या जाणाऱ्या द्रववाहिन्या असतात. आपल्या शरीरात कशा रक्तवाहिन्या असतात तशा या झाडांच्या जीवनवाहिन्याच असतात. त्यांचा घेर साधारण एका मिलीमीटरच्या एक-दशांश इतकाच असतो. मुळांशी घातलेलं पाणी या नलिकांमधून वर चढत जातं. पाण्याने भरलेल्या ग्लासामध्ये एखादी स्ट्रॉ किंवा काचेची बारीकशी नळी ठेवली तर तिच्यातही असं पाणी वर चढत जाताना दिसतं. यालाच केशाकर्षण किंवा कॅपिलरी ॲक्शन असं म्हणतात.

भूतानचे राजे जिम्मे खेसर नामग्याल सिंग्ये वांगचुक यांच्या निमंत्रणाला मान देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दोन दिवसांचा भूतान दौरा नुकताच पार पडला. लाल किल्ला परिसरातील स्फोटाने देश हादरलेला असताना आपण भूतानला अतिशय जड अंत:करणाने आलेलो आहोत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली.

# भूतानभेटीतून काय साधले ?

वास्तविक भूतानच्या दौऱ्यास मोदी सरकारने नेहमीच महत्त्व दिले आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांनी एक हजार मेगावॅटच्या हायड्रो प्रोजेक्टचे अनावरण केले. तसेच ऊर्जा, रेल्वे, दळणवळण आणि विकासकामांवर देखील चर्चा यावेळी पार पडली. याशिवाय दहा हजार कोटी रुपयांची आर्थिक मदतही भारताकडून दिली जाणार आहे. यावरून भारत भूतानाला किती महत्त्व देतो, हे लक्षात येते. पंतप्रधानांच्या या दौऱ्यादरम्यान भूतानच्या १३ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत भूतानमध्ये आकाराला येत असलेल्या विविध प्रकल्पांच्या संदर्भात भारताने केलेल्या मदतीबद्दल तसेच भूतानच्या विकासात भारताने दिलेल्या योगदानाबद्दल भूतानतर्फे देखील कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. भूतान हा भारताचा सर्वात लहान शेजारी देश. परंतु त्याचे सामरिक स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण एकीकडे चीनच्या ताब्यात असलेले तिबेट आणि दुसरीकडे भारत. गेल्या ११ वर्षात मोदींनी चार



वेळेस भूतानला भेट दिली. भूतानचे पंतप्रधान आणि राजांनी देखील भारताचे सतत दौरे केले आहेत. याप्रमाणे उभय देशांकडून संवेदनशील संबंधांना दिले जाणारे राजनैतिक महत्त्व अधोरेखित होते. भूतान एकाकी पडला किंवा तो थोडाही शिथिल वाटला तर विस्तारवादी ड्रॅगन कधी गिळकृत करेल, यांचा भरवसा नाही. शिवाय भारताच्या सीमेवर आणखी एक डोकेदुखी वाढविण्याचे काम करेल

केली आणि ती भारतासाठी कायम स्वरूपात अडचणीची बाब ठरली. सध्याचा चीनचा विस्तार पाहता भारताला चीनच्या सावटाखाली भूतान राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागणार आहे. चीनकडून बळजबरीने ताबा घेण्यापासून त्याला वाचविणे हा केवळ पुस्तकी किंवा सैद्धांतिक मुद्दा राहिलेला नाही.

सीलाईट नावाच्या एक आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थेच्या मते, अलीकडच्या काळात चीनने भूतानच्या पारंपरिक सीमेच्या आत किमान २२ गावांची निर्मिती केली असून तो भूतानच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत दोन टक्के जागांवरील ताबा मानला जात आहे. चीनने वसविलेल्या या गावांत रस्ते, सैनिकी चौकी, प्रशासकीय केंद्राचा समावेश आहे. यास चीनने ठोस आधार सादर केला असून त्याला नकार देणे सहजासहजी शक्य नाही. चीनने सीमेसंदर्भात भूतानशी केलेल्या चर्चेत नवीन दावे केले आणि यानुसार भूतानचे सार्वभौमत्व हळूहळू कसे अस्तंगत होईल आणि सैन्य भारताच्या सीमेला कसे घेरेल याद्दष्टीने ड्रॅगनच्या हालचाली सुरू आहेत. २०१७ मध्ये डोकलाममध्ये चीनने बेकायदा मार्गाने रस्ता उभारण्याचा प्रयत्न केला. तो एक दीर्घकालीन योजनेचा भाग होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**पटसंख्येच्या आधारे समायोजन** राज्यातील १८ हजार शाळांना फटका

# नववी, दहावीचे विद्यार्थी शिक्षकांविना?

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पटसंख्येच्या आधारे संचमान्यता करण्याचा शासन निर्णय उच्च न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर आता राज्यातील जवळपास १८ हजार माध्यमिक इयत्तांचे वर्ग बिनशिक्षकी होण्याची शक्यता आहे. संचमान्यतेच्या १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ९ वी व १० वीच्या वर्गासाठी किमान २० विद्यार्थ्यांची अट ठेवण्यात आली असून, राज्यातील जवळपास १८ हजार शाळांमध्ये या वर्गांमधील विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी आहे.**

## समायोजन करण्याचे आदेश



### वर्गातील शिक्षकांची संख्या शून्य

त्यामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या संचमान्यतेनुसार राज्यातील अनेक शाळांमधील शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत.अतिरिक्त शिक्षकांचे ५ डिसेंबरपर्यंत जिल्हास्तरावर समायोजन करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांतील शिक्षण अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानंतर विभाग स्तरावर आणि २० डिसेंबरपर्यंत राज्य स्तरावर समायोजन करण्यात येणार आहे.

शिक्षण संचालकांच्या आदेशानुसार ५ डिसेंबरपर्यंत शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविल्यास ऐन परीक्षांच्या कालावधीत या १८ हजार शाळांमधील इयत्ता ९ व १० वीच्या वर्गातील शिक्षकांची संख्या शून्य होणार आहे. परिणामी, दहावीच्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. वास्तविक इयत्ता ९ वी १० वीला समाजशास्त्रासाठी एक, भाषांसाठी एक व गणित व विज्ञान या विषयांसाठी एक असे तीन शिक्षक दिले जात होते. मात्र नव्या शासन निर्णयानुसार इयत्ता ९ वी व १० वीच्या प्रत्येक वर्गात २० विद्यार्थी असल्यास एक शिक्षक देण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या संचमान्यतेनुसार राज्यातील अनेक शाळांमधील शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत.अतिरिक्त शिक्षकांचे ५ डिसेंबरपर्यंत जिल्हास्तरावर समायोजन करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांतील शिक्षण अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानंतर विभाग स्तरावर आणि २० डिसेंबरपर्यंत राज्य स्तरावर समायोजन करण्यात येणार आहे. या समायोजन प्रक्रियेमुळे राज्यातील जवळपास १८ हजार शाळांमध्ये शिक्षक संख्या शून्य होण्याची शक्यता आहे. दरम्यान, हा न्यायालयीन निर्णय असल्याने शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रतिक्रियेस नकार दिला आहे.दहावीच्या परीक्षा फेब्रुवारीमध्ये होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उजळणीच्या कालावधीतच शिक्षक नसल्यास विद्यार्थ्यांना शिकविणार कोण? त्यांचा अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार? त्यांच्या तोंडी व विज्ञान प्रात्यक्षिक परीक्षा कोण घेणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया राबवून मराठी माध्यमाच्या शाळांसह अन्य भाषिक शाळा बंद पाडण्याचा घाट शिक्षण विभागाकडून घालण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना तीन विषय शिक्षक देण्यात यावेत. पटसंख्येच्या आधारे संचमान्यता करण्याचा शासन निर्णय उच्च न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर आता राज्यातील जवळपास १८ हजार माध्यमिक इयत्तांचे वर्ग बिनशिक्षकी होण्याची शक्यता आहे. संचमान्यतेच्या १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ९ वी व १० वीच्या वर्गासाठी किमान २० विद्यार्थ्यांची अट ठेवण्यात आली असून, राज्यातील जवळपास १८ हजार शाळांमध्ये या वर्गांमधील विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी आहे. शिक्षण संचालकांच्या आदेशानुसार ५ डिसेंबरपर्यंत शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविल्यास ऐन परीक्षांच्या कालावधीत या १८ हजार शाळांमधील इयत्ता ९ व १० वीच्या वर्गातील शिक्षकांची संख्या शून्य होणार आहे. परिणामी, दहावीच्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. वास्तविक इयत्ता ९ वी १० वीला समाजशास्त्रासाठी एक, भाषांसाठी एक व गणित व विज्ञान या विषयांसाठी एक असे तीन शिक्षक दिले जात होते. मात्र नव्या शासन निर्णयानुसार इयत्ता ९ वी व १० वीच्या प्रत्येक वर्गात २० विद्यार्थी असल्यास एक शिक्षक देण्याची तरतूद केली आहे.

# राज्यात सात महिन्यांत २२ कोटींचा गुटखा जप्त

## गुटखाविक्री करणाऱ्यांवर 'मोकका' अंतर्गत कारवाईचे एफडीए संकेत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यांसारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) वारंवार कारवाई करण्यात येते. त्यानुसार मागील सात महिन्यांत राज्यात तब्बल २२ कोटी रूपयांपेक्षा जास्त किंमतीचा माल जप्त केला आहे.**



### मकोका अंतर्गत कारवाई

राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यांसारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) वारंवार कारवाई करण्यात येते. त्यानुसार मागील सात महिन्यांत राज्यात तब्बल २२ कोटी रूपयांपेक्षा जास्त किंमतीचा माल जप्त केला आहे.

शालेय विद्यार्थी व तरुण पिढीला गुटख्यापासून दूर ठेवण्यासाठी त्याची चोर वाटेने उलाढाल करणाऱ्यांवर 'मकोका' कायद्यान्वये कारवाई करण्याचा निर्णय एफडीएकडून घेण्यात आला आहे.राज्यात गुटखा, पानमसाला, सुपारी, खर्रा, मावा या अन्नपदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही अनेक ठिकाणी त्याची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे या प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून वारंवार कारवाई करण्यात येते. त्यातूनच १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत एफडीएने राज्यातील ३६५ दुकानांवर कारवाई केली. यामध्ये ३५४ दुकानांमध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थ आढळले. या कारवाईत २२ कोटी १७ लाख ८९ हजार ९१४ रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला. त्यातून राज्यात मोठ्या प्रमाणात चोर वाटेने प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू व सुपारी, खर्रा, मावा यांमुळे शालेय विद्यार्थी व तरुणांवर होणारे परिणाम लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यात गुटखा विक्री आणि उत्पादनावर बंदी असली तरी परराज्यातून अवैध मार्गाने राज्यात गुटखा येतो. अगदी शाळा, महाविद्यालयांजवळील टपर्‍यांवरही सर्रास गुटखा विकला जातो. त्यावर जप्ती आणि विक्रेत्यांवर फौजदारी कारवाई करूनही पुन्हा काही दिवसांनी गुटखा मिळू लागतो. गुटख्याच्या व्यसनामुळे शालेय विद्यार्थी व तरुण पिढी अनेक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जात आहे. त्यामुळे गुटखा विक्री करणाऱ्यांवर 'मकोका' या कायद्यानुसार कारवाई करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबत मंत्री नरहरी झिरवाळ यांनी संकेत दिले आहेत. आहे. त्याला जबाबदार असलेल्या व्यक्तिविरुद्ध मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करता येऊ शकेल का, याबाबत विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठवून मार्गदर्शन घेण्यात येणार आहे.

‘जी२०’ शिखर परिषद

‘आयबीएसए’ बैठकीत पंतप्रधान मोदी यांची भूमिका

# सुरक्षा परिषदेत सुधारणांची गरज

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत (यूएनएससी) सुधारणा करणे हा केवळ पर्याय उरला नसून ती आता एक गरज झाली आहे, असे ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. जोहान्सबर्ग येथे सुरू असलेल्या जी-२० शिखर परिषदेदरम्यान भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या तीन देशांच्या (आयबीएसए) नेत्यांची परिषद झाली. त्या वेळी जागतिक संघटनांमध्ये बदलावर चर्चा झाली.**

## आणखी एका वादाची ठिणगी?



पंतप्रधान नरेंद्र मोदी, ब्राझीलचे अध्यक्ष लुइस इनासिओ लुला डिसिल्वा आणि दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरील रामाफोसा या बैठकीत सहभागी झाले. या वेळी मोदी म्हणाले की, जगाची विभागणी झाल्याचे चित्र असताना ‘आयबीएसए’ ऐक्य, सहकार्य आणि मानवतेचा संदेश देऊ शकतो. तिन्ही देशांदरम्यान सुरक्षाविषयक सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी ‘आयबीएसए’च्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या स्तरावर बैठका सुरू करण्याचा प्रस्तावही मोदी यांनी मांडला.मानवकेंद्रित विकासासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. तिन्ही देशांदरम्यान ‘यूपीआय’सारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ‘कोविन’सारखे आरोग्य मंच उभारण्यासाठी, सायबर सुरक्षा चौकटी आणि महिलांच्या नेतृत्वात तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम सामायिक करण्यासाठी ‘आयबीएसए डिजिटल इनोव्हेशन अलायन्स’ स्थापित करण्याचा प्रस्तावही मोदी यांनी मांडला. दहशतवादाविरोधातील लढाईमध्ये आपण सहकार्याने पुढे गेले पाहिजे. अशा गंभीर मुद्द्यावर कोणत्याही दुटप्पीपणाला जागा नाही. जी-२० शिखर परिषदेच्या तिसऱ्या सत्रामध्ये कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) विषयावर चर्चा झाली. या वेळी पंतप्रधान मोदी यांनी ‘एआय’च्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त करत तो रोखण्यासाठी जागतिक धोरण आखण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच अशा महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांचा वापर हा वित्त-केंद्रित न ठेवता मानव-केंद्रित व्हायला हवा, असे आवाहनही त्यांनी केले.जी-२० शिखर परिषदेला अमेरिकेचे अध्यक्ष किंवा वरिष्ठ अधिकारी उपस्थित न राहता काही कनिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या देशाचे प्रतिनिधित्व केले. पुढील शिखर परिषद अमेरिकेत होत असून प्रथेप्रमाणे जी-२०चे अध्यक्षपद यजमान दक्षिण आफ्रिकेने अमेरिकेकडे सोपवणे अपेक्षित होते. मात्र, आपण कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे यजमानपद सोपवणार नाही, अशी भूमिका यजमान देशाने घेतल्यामुळे त्यावरून आणखी एक राजनैतिक वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत (यूएनएससी) सुधारणा करणे हा केवळ पर्याय उरला नसून ती आता एक गरज झाली आहे, असे ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. जोहान्सबर्ग येथे सुरू असलेल्या जी-२० शिखर परिषदेदरम्यान भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या तीन देशांच्या (आयबीएसए) नेत्यांची परिषद झाली. त्या वेळी जागतिक संघटनांमध्ये बदलावर चर्चा झाली.पंतप्रधान नरेंद्र मोदी, ब्राझीलचे अध्यक्ष लुइस इनासिओ लुला डिसिल्वा आणि दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरील रामाफोसा या बैठकीत सहभागी झाले. या वेळी मोदी म्हणाले की, जगाची विभागणी झाल्याचे चित्र असताना ‘आयबीएसए’ ऐक्य, सहकार्य आणि मानवतेचा संदेश देऊ शकतो. तिन्ही देशांदरम्यान सल्लागारांच्या स्तरावर बैठका सुरू करण्याचा प्रस्तावही मोदी यांनी मांडला.मानवकेंद्रित विकासासाठी तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले‘कोविन’सारखे आरोग्य मंच उभारण्यासाठी, सायबर सुरक्षा चौकटी आणि महिलांच्या नेतृत्वात तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम सामायिक करण्यासाठी ‘आयबीएसए डिजिटल इनोव्हेशन अलायन्स’ स्थापित करण्याचा प्रस्तावही मोदी यांनी मांडला.

### ‘एआय’च्या गैरवापराबद्दल चिंता

दहशतवादाविरोधातील लढाईमध्ये आपण सहकार्याने पुढे गेले पाहिजे. अशा गंभीर मुद्द्यावर कोणत्याही दुटप्पीपणाला जागा नाही. जी-२० शिखर परिषदेच्या तिसऱ्या सत्रामध्ये कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) विषयावर चर्चा झाली. या वेळी पंतप्रधान मोदी यांनी ‘एआय’च्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त करत तो रोखण्यासाठी जागतिक धोरण आखण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच अशा महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांचा वापर हा वित्त-केंद्रित न ठेवता मानव-केंद्रित व्हायला हवा, असे आवाहनही त्यांनी केले.

# एसआयआर सुधारणा नसून जुलूम

## नागरिकांचा छळ करण्यासाठी जाणीवपूर्वक केलेली चाल

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशातील नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) सुरू आहे. यादरम्यान किमान १५ मतदान केंद्र अधिकाऱ्यांचा (बीएलओ) मृत्यू झाल्यावरून काँग्रेसने भाजपला लक्ष्य केले आहे. ‘एसआयआर’ ही सुधारणा नसून लादलेला जुलूम आहे, तसेच नागरिकांचा छळ करण्यासाठी जाणीवपूर्वक केलेली चाल आहे, अशी टीका काँग्रेसने केली आहे.**



‘बीएलओं’चा मृत्यू हा अनावश्यक दबावामुळे झालेला असून त्याकडे आनुषंगिक नुकसान म्हणून दुर्लक्ष केले जात आहे, अशी टीका काँग्रेसने केली. पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी रविवारी एका हिंदी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी ‘एक्स’वर प्रसिद्ध करत, ‘एसआयआर’च्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “निवडणूक आयोगाने अशी व्यवस्था निर्माण केली आहे, ज्यामध्ये नागरिकांनी २२ वर्षे जुन्या मतदारयाद्यांच्या हजारो पानांमध्ये स्वतःचे नाव शोधावे लागत आहे. याचा उद्देश स्पष्ट आहे – खऱ्या मतदारांना बाहेर ठेवणे आणि बनावट मतदारांना कायम ठेवणे,” अशी टीका राहुल यांनी केली.‘एसआयआर’च्या अंमलबजावणीदरम्यान गेल्या १९ दिवसांमध्ये सहा राज्यांमध्ये किमान १५ ‘बीएलओं’चा मृत्यू झाला असून एकजण बेपत्ता आहे. मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये प्रत्येकी चार, पश्चिम बंगालमध्ये तीन तर राजस्थान, केरळ आणि तमिळनाडू येथे प्रत्येकी एका ‘बीएलओ’चा मृत्यू झाला आहे. यापैकी किमान दोघांचा मृत्यू हृदयविकाराच्या धक्क्याने झाला तर किमान चौघांनी आत्महत्या केली.देशभरात ‘एसआयआर’च्या नावाखाली गोंधळ निर्माण करण्यात आला आहे. परिणाम? तीन आठवड्यांमध्ये १६ ‘बीएलओं’नी प्राण गमावले आहे. हृदयविकाराचा धक्का, तणाव, आत्महत्या... ‘एसआयआर’ ही सुधारणा नाही, तो लादलेला जुलूम आहे. भाजप चोरलेल्या सत्तेची फळे खाण्यात मग्न आहे, तर निवडणूक आयोग मूक प्रेक्षक होऊन पाहत आहे. ‘एसआयआर’ची घाईघाईने, विनानियोजन,निश्चलनीकरण आणि कोविड-१९ टाळेबंदीची आठवण करून देणारा आहे. देशातील नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) सुरू आहे.

### काँग्रेसने भाजपला लक्ष्य केले

यादरम्यान किमान १५ मतदान केंद्र अधिकाऱ्यांचा (बीएलओ) मृत्यू झाल्यावरून काँग्रेसने भाजपला लक्ष्य केले आहे. ‘एसआयआर’ ही सुधारणा नसून लादलेला जुलूम आहे, तसेच नागरिकांचा छळ करण्यासाठी जाणीवपूर्वक केलेली चाल आहे, अशी टीका काँग्रेसने केली आहे. ‘बीएलओं’चा मृत्यू हा अनावश्यक दबावामुळे झालेला असून त्याकडे आनुषंगिक नुकसान म्हणून दुर्लक्ष केले जात आहे.

# ‘लाखात एक आमचा दादा’ फेम अभिनेत्री रमली शेतकामात

मराठी कलाकार हे त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकतातच, पण अनेकदा या कलाकारांचा साधेपणाही चाहत्यांना भावतो. मराठी कलाकार हे ग्लॅमरस इंडस्ट्रीत काम करत असले; तरी अनेकदा ही कलाकार मंडळी आयुष्यात अगदी साधेपणाने जगत असतात. मालिका, चित्रपटात स्टार असणारे हे कलाकार वैयक्तिक आयुष्यात अगदी साधेपणाने आयुष्य जगत असतात. अशाच साधेपणा जपणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे राजश्री निकम. राजश्री निकम या सोशल मीडियावर कायमच सक्रिय असतात. सोशल मीडियाद्वारे ते त्यांचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. त्याचबरोबर कामानिमित्तची माहितीही शेअर करत असतात. अशातच त्यांनी सोशल मीडियावर शेअर केलेला एक व्हिडीओ सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.राजश्री यांनी शेअर केलेला हा व्हिडीओ शेतीकामाचा आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या या व्हिडीओ त्या कापणी



करतानाचे दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करत त्यांनी शेती आणि एन्जॉय असंही म्हटलं आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या आनंदाने शेतीकाम करत असतानाचे पाहायला मिळत आहे. राजश्री निकम यांनी शेअर केलेला व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.अनेकांनी या व्हिडीओला लाईक्स आणि कमेंट्सद्वारे चांगलाच प्रतिसाद दिला आहे. त्याचबरोबर अनेकांनी अभिनेत्रीच्या साधेपणाचंही कौतुक केलं आहे. अभिनेत्री अश्विनी महांगडेनेही राजश्री यांच्या या व्हिडीओवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अश्विनीने ‘ताई’ अशी कमेंट करत अभिनेत्रीच्या कृतीचं कौतुक केलं आहे. त्याचबरोबर अभिनेत्री सारिका नवाथे यांनीसुद्धा हा व्हिडीओ आवडला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.दरम्यान, राजश्री निकम या सध्या झी मराठी वाहिनीवरील ‘लाखात एक आमचा दादा’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

## दीपिका कक्करला ट्यूमर

टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर दुसऱ्या टप्प्यातील यकृताच्या कर्करोगाने ग्रस्त आहे. एका महिन्यापूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती ज्यामध्ये तिच्या यकृतातून टेनिस बॉलच्या आकाराचा ट्यूमर काढण्यात आला होता. अलीकडेच दीपिका पुन्हा पती शोएब इब्राहिमसह रुग्णालयात गेली होती. आता एका नवीन व्लॉगमध्ये शोएब इब्राहिमने खुलासा केला आहे की ट्यूमर शस्त्रक्रियेदरम्यान दीपिकाच्या यकृताचा काही भाग देखील कापावा लागला.नवीन व्लॉगमध्ये, दीपिका कक्कर आणि शोएब इब्राहिम त्यांचा मुलगा रुहान आणि पुतण्या हैदरसाठी खरेदी करताना दिसत आहेत. खरेदी केल्यानंतर घरी परतताना, दीपिका खूप थकलेली दिसते, ज्यावर शोएब म्हणतो “कधीकधी थकवा येतो आणि काहीही असो, शस्त्रक्रियेला फक्त एक महिना झाला आहे. यकृताचा एक भाग काढावा लागला.”शोएब इब्राहिम हाताने आकार दाखवत पुढे म्हणतो “तिच्या यकृताचा इतका भाग गेला आहे, इतका मोठा ट्यूमर आणि इतका भाग गेला आहे.”आज माझे टाके देखील काढले गेले आहेत.” मग शोएब म्हणतो “डॉक्टर म्हणत होते की कधीकधी असा दिवस येतो जेव्हा तुम्हाला काहीही करावेसे वाटत नाही.

## सोनालीचा मराठमोळा अंदाज!



मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रत्येक अपडेट सोनाली इन्स्टाग्रामवर शेअर करत असते. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकताच अभिनेत्रीने शेअर केलेला डान्स व्हिडीओ सर्वत्र चर्चेत आला आहे. अलीकडच्या काळात सोशल मीडियावर नवनवीन गाणी व्हायरल होत असतात. सध्या इन्स्टाग्रामवर एका व्हायरल कवितेने सर्वांचं मन जिंकून घेतलं आहे. ही कविता वैभव जोशी आणि अमर ओक यांच्या ऋतू बरवा कार्यक्रमामुळे चर्चेत आली आहे. या कवितेच्या ओळी आहेत...या व्हायरल कवितेने सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली कुलकर्णीला देखील या गाण्याची भुरळ पडली आहे. सध्या सोनाली कामानिमित्त इंग्लंड दौऱ्यावर आहे. याठिकाणी मराठमोळा लूक करून सोनालीने व्हायरल गाण्यावर ठेका धरल्याचं पाहायला मिळत आहे. सोनाली लिहिते, “व्हायरल कवितेवर REEL व्हिडीओ बनवला नाही तर पाप लागेल...आणि ती संधी इंग्लंडमध्ये युरोपियन मराठी संमेलनच्या निमित्ताने मिळाली. अशी संधी मिळत असेल तर का बरं सोडावी?”सोनालीच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांसह मराठी कलाकारांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. “खूप छान सोनाली मॅडम”, “पैठणीच्या कोणत्याही ड्रेसमध्ये ताई तू सुंदरच दिसतेस... आणि आज मराठमोळा लूक करून डान्स... कमाल”, “ट्रेंड सेटर सोनाली मॅम” अशा प्रतिक्रिया अभिनेत्रीने या व्हिडीओवर दिल्या आहेत. दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर येत्या काळात ती ‘मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी’ या सिनेमात प्रमुख भूमिका साकारताना दिसेल. हा सिनेमा कथालेखक आणि इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या मोगलमर्दिनी महाराणी ताराबाई या पुस्तकावर आधारित आहे.मराठी कलाविश्वाची ‘अप्सरा’ म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णीला ओळखलं जातं. ‘नटरंग’, ‘हिरकणी’, ‘मितवा’, ‘पोश्टर गर्ल’ अशा बऱ्याच गाजलेल्या चित्रपटांमध्ये सोनालीने प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. अभिनेत्री सोशल मीडियावर कायम सक्रिय असते.

## स्क्विड गेम 3’ च्या शेवटावर प्रेक्षकांची नाराजी

दक्षिण कोरियाची वेबसीरीज ‘स्क्विड गेम’ पहिल्या भागापासून ओटीटी विश्वात धुमाकूळ घालत आहे. २७ जून रोजी या मालिकेचा तिसरा आणि अखेरचा सीझन प्रदर्शित झाला. प्रदर्शन झाल्यानंतर या मालिकेने अनेक विक्रम मोडीत काढले आहेत. लाखो चाहत्यांनी बिंज वॉच केल्यामुळे नेटफ्लिक्सचे ॲप काही वेळासाठी क्रॅश झाल्याची बातमीही समोर आली होती. मात्र या सीझनचा शेवट अनेक चाहत्यांना आवडलेला नाही. त्यावरून आता टीका सुरू झाली आहे. दक्षिण कोरियातही याचे पडसाद उमटले असून थेट शेअर बाजारात स्क्विड गेमशी निगडित कंपन्यांच्या समभागात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. अखेर या सीरीजचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते ह्वांग डोंग-ह्युक यांनी नेटफ्लिक्स आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांना मुलाखत देऊन शेवट असा का केला? याची माहिती दिली.स्क्विड गेम वेबसीरीजमधील सर्वच पात्र हे या सीरीजचे सर्वात मोठे शक्तीस्थळ आहे. त्यांचे वैयक्तिक आयुष्य, त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम, संकट समोर असताना त्यांच्यातील समोर आलेले खरे रुप, माणुसकी, लोभ, लालसा आणि हिंस्रपणा या भावना मालिकेत पदोपदी ठासून भरलेल्या आहेत. त्याबरोबर मालिकेत खेळले जाणारे खेळ त्यात अजून रंगत भरतात. पहिल्या सीझनपासून मध्यवर्ती भूमिका असलेले प्लेअर नंबर. ४५६ अर्थात गि-हून हे पात्र प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.अभिनेते ली जंग-जे यांनी स्क्विड गेममध्ये गि-हून हे पात्र साकारले आहे. त्यांच्या पात्राशी जगभरातील चाहते जोडले गेले असताना शेवटच्या सीझनमधील अखेरच्या भागात त्यांचा शेवट दाखविण्यात आल्यामुळे चाहते चांगलेच संतापले आहेत. पहिल्या सीझनप्रमाणे हॅप्पी एंडिंगचा कयास बांधलेल्या चाहत्यांना हा मोठा धक्काच होता. यातून दिग्दर्शक आणि निर्मात्यांवर टीका होऊ लागली. अखेर नेटफ्लिक्सला दिलेल्या मुलाखतीत दिग्दर्शकांनी यावर उत्तर दिले. लेखक,अभिनेते ली जंग-जे आणि फ्रंट मॅनचे पात्र रंगविणाऱ्या ह्वांग इन-हो यांनी नेटफ्लिक्सवर तिसऱ्या सीझनबाबत संवाद साधला.



## मानसी १० वर्षे टेलिव्हिजनपासून का दूर होती?

बॉलीवूडची क्वीन कंगना रणौत अभिनयासह तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती अनेक विषयांवर तिची मतं मांडत असते. लवकरच तिचा ‘इमर्जेन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिने भारताच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली आहे. कंगना नेहमीच राजकीय विषयांवर आपले मत मांडत असते. दरम्यान नुकत्याच एका मुलाखतीत तिने राजकीय प्रवेशाबाबत वक्तव्य केले आहे.कंगनाने याअगोदर अनेकदा राजकारणात येण्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये कंगनाने राजकीय प्रवेशाबाबत मत व्यक्त केले होते. ती म्हणाली होती “जर भगवान कृष्णाची इच्छा असेल तर मी लोकसभा निवडणुकाही लढवेन.”आता नुकत्याच एका मुलाखतीत कंगनाने पुन्हा एकदा राजकीय प्रवेशाबाबत मोठे वक्तव्य केले आहे.सध्या कंगना ‘इमर्जेन्सी’ चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान एका मुलाखतीत तिला तुला देशाची पंतप्रधान बनण्याची इच्छा आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देत कंगना म्हणाली, ‘मी ‘इमर्जेन्सी’ नावाचा एकच चित्रपट केला आहे. तो चित्रपट पाहिल्यानंतर मी पंतप्रधान व्हावे असे कोणालाच वाटणार नाही. ‘इमर्जेन्सी’ हा आपल्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा आणि काळा अध्याय आहे.

लिव्हरपूलसाठी चिंताजनक बाब

## फुटबॉलमध्ये नॉटिंगहॅम फॉरेस्टकडून धक्का

# लिव्हरपूलची पराभवाची मालिका कायम

## १२ पैकी सहा सामन्यांत हार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गतविजेत्या लिव्हरपूलची इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉलच्या यंदाच्या हंगामातील निराशाजनक कामगिरी कायम असून घरच्या मैदानावर त्यांना नॉटिंगहॅम फॉरेस्ट संघाकडूनही पराभव पत्करावा लागला. फॉरेस्टने हा सामना ३-० असा मोठ्या फरकाने जिंकला. लिव्हरपूलसाठी चिंताजनक बाब म्हणजे प्रीमियर लीगमधील गेल्या सात सामन्यांत हा त्यांचा सहावा पराभव ठरला. त्यामुळे २० संघांचा समावेश असलेल्या या स्पर्धेच्या गुणतालिकेत लिव्हरपूलची ११व्या स्थानी घसरण झाली आहे.**



फॉरेस्टविरुद्ध ॲनफिल्ड मैदानावर झालेल्या लढतीत सुरुवातीला लिव्हरपूलचे वर्चस्व होते. मात्र, याचा त्यांना फायदा करून घेता आला नाही.लिव्हरपूलने गोलच्या दिशेने मारलेले फटके फॉरेस्टचा गोलरक्षक मॅट्झ सेल्झ आणि बचावपटूंनी अडवले. फॉरेस्टने बचाव भक्कम ठेवत प्रतिआक्रमणाचा प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नांना ३३व्या मिनिटाला यश आले.मुरिलोने जोरदार फटक्यासह गोल नोंदवत फॉरेस्टला आघाडी मिळवून दिली. यानंतर लिव्हरपूलने चेंडूवर बराच वेळ ताबा राखण्यास गोलच्या काही संधी निर्माण केल्या. मात्र, त्यांना गोलखाते उघडता आले नाही. याउलट फॉरेस्टच्या फटक्यांमध्ये अधिक अचूकता होती. उत्तरार्धात निकोलो सवोना (४६व्या मिनिटाला) आणि मॉर्गन गिब्ज-व्हाईट (७८व्या मिनिटाला) यांनी गोल करत फॉरेस्टच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.“आमच्यासाठी हा अतिशय वाईट निकाल असून या पराभवाची मी पूर्ण जबाबदारी घेतो,” असे वक्तव्य लिव्हरपूलचे प्रशिक्षक आर्ने स्लॉट यांनी केले. “मी कोणतीही कारणे देणार नाही. आम्ही गेल्या काही सामन्यांत चांगला खेळ करण्यात अपयशी ठरत आहोत, त्यामुळेच आमच्यावर पराभवाची नामुष्की ओढवते आहे,” असे स्लॉट यांनी मान्य केले. मँचेस्टर सिटीलाही पराभवाचा धक्का बसला. न्यूकॅसल युनायटेडने सिटीवर २-१ असा विजय मिळवला. न्यूकॅसलसाठी दोनही गोल हार्वी बार्न्सने (६४ आणि ७०व्या मिनिटाला) केले. प्रीमियर लीगमध्ये सिटीचा १२ सामन्यांत हा चौथा पराभव होता. दुसरीकडे, चेल्सीने सलग तिसऱ्या विजयाची नोंद करताना बर्नलीवर २-० अशी मात केली. त्यांच्यासाठी पेड्रो नेटो (३७व्या मि.) आणि एंझो फर्नांडिझ (८८व्या मि.) यांनी गोल केले. चेल्सीचा संघ २३ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. गतविजेत्या लिव्हरपूलची इंग्लिश

### पराभवाची नामुष्की

आम्ही गेल्या काही सामन्यांत चांगला खेळ करण्यात अपयशी ठरत आहोत, त्यामुळेच आमच्यावर पराभवाची नामुष्की ओढवते आहे,” असे स्लॉट यांनी मान्य केले.मँचेस्टर सिटीलाही पराभवाचा धक्का बसला. न्यूकॅसल युनायटेडने सिटीवर २-१ असा विजय मिळवला. न्यूकॅसलसाठी दोनही गोल हार्वी बार्न्सने (६४ आणि ७०व्या मिनिटाला) केले. प्रीमियर लीगमध्ये सिटीचा १२ सामन्यांत हा चौथा पराभव होता. दुसरीकडे, चेल्सीने सलग तिसऱ्या विजयाची नोंद करताना बर्नलीवर २-० अशी मात केली.

प्रीमियर लीग फुटबॉलच्या यंदाच्या हंगामातील निराशाजनक कामगिरी कायम असून घरच्या मैदानावर त्यांना नॉटिंगहॅम फॉरेस्ट संघाकडूनही पराभव पत्करावा लागला. फॉरेस्टने हा सामना ३-० असा मोठ्या फरकाने जिंकला. लिव्हरपूलसाठी चिंताजनक बाब म्हणजे प्रीमियर लीगमधील गेल्या सात सामन्यांत हा त्यांचा सहावा पराभव ठरला. त्यामुळे २० संघांचा समावेश असलेल्या या स्पर्धेच्या गुणतालिकेत लिव्हरपूलची ११व्या स्थानी घसरण झाली आहे. फॉरेस्टविरुद्ध ॲनफिल्ड मैदानावर झालेल्या लढतीत सुरुवातीला लिव्हरपूलचे वर्चस्व होते. मात्र, याचा त्यांना फायदा करून घेता आला नाही. लिव्हरपूलने गोलच्या दिशेने मारलेले फटके फॉरेस्टचा गोलरक्षक मॅट्झ सेल्झ आणि बचावपटूंनी अडवले. फॉरेस्टने बचाव भक्कम ठेवत प्रतिआक्रमणाचा प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नांना ३३व्या मिनिटाला यश आले.मुरिलोने जोरदार फटक्यासह गोल नोंदवत फॉरेस्टला आघाडी मिळवून दिली. यानंतर लिव्हरपूलने चेंडूवर बराच वेळ ताबा राखण्यास गोलच्या काही संधी निर्माण केल्या. मात्र, त्यांना गोलखाते उघडता आले नाही. याउलट फॉरेस्टच्या फटक्यांमध्ये अधिक अचूकता होती. उत्तरार्धात निकोलो सवोना (४६व्या मिनिटाला) आणि मॉर्गन गिब्ज-गोल करत फॉरेस्टच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.“आमच्यासाठी हा अतिशय वाईट निकाल असून या पराभवाची मी पूर्ण जबाबदारी घेतो,” असे वक्तव्य लिव्हरपूलचे प्रशिक्षक आर्ने स्लॉट यांनी केले.

# सलग दुसऱ्यांदा भारतीय महिला अंतिम फेरीत

## कबड्डी विश्वचषकात इराणवर चुरशीच्या लढतीत विजय

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**निर्णायक क्षणी संजू देवीने केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने रविवारी पारंपरिक प्रतिस्पर्धी इराणवर ३३-२१ अशी मात करून सलग दुसऱ्यांदा महिला विश्वचषक कबड्डी स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. विजेतेपदासाठी भारताची गाठ चायनीज तैपेइशी पडणार आहे. तैपेइने दुसऱ्या उपांत्य लढतीत बांगलादेशचा २५-१८ असा पराभव केला.**



ढाका येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी लढतीत भारतीय महिलांचा कस लागला नव्हता. त्यामुळे इराणविरुद्ध भारतीय खेळाडू कसा खेळ करतात याकडे चाहत्यांचे लक्ष होते. मैदानाबाहेर प्रशिक्षक तेजस्विनी यांनी मोठी आघाडी मिळविण्याचे नियोजन केले होते. भारतीय महिला खेळाडूंनी सुरुवातीला आघाडी कायम राखली आणि निर्णायक क्षणी खेळ उंचावत आघाडीतील फरक मोठा केला.सोनाली शिंगटे, पुष्पा आणि कमालीच्या लयीत असलेल्या संजूच्या पकडी करत इराणच्या बचाव फळीने भारतीय संघासमोर आव्हान उभे केले होते. त्यामुळेच मध्यंतराला भारताला केवळ १५-११ अशी चारच गुणांची आघाडी मिळवता आली.उत्तरार्धात भारतीय महिलांनी सर्व प्रथम इराणवर लोण चढवत आघाडी २७-१७ अशी भक्कम केली.

या वेळी संजूची चढाई निर्णायक ठरली. एका अव्वल पकडीसह तीन वेळा बाद झालेल्या संजूने या वेळी तीन बचावपटूंचे प्रयत्न शिताफीने परतवून लावत इराणचे दोन गडी टिपले आणि त्यानंतर भारतीय बचाव फळीने इराणच्या त्यानंतर सोनाली शिंगटेने बोनससह एक बळी मिळवत दोन गुणांची कमाई केली.

### विजयात मोलाची भूमिका

संजूने पुन्हा एकदा आपल्या चढाईत दोन गुण मिळवत भारताची आघाडी कायम राखली. अखेरच्या मिनिटात संजूने एक पकडही केली. संजूने ७ चढाईत ७ गुण, तर सोनालीने ९ चढाईत ४ गुणांची कमाई करून विजयात मोलाची भूमिका बजावली. निर्णायक क्षणी साक्षी आणि रितू नेगीने आपला बचाव भक्कम ठेवला.इराण संघाची ताकद ओळखून होते.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार।
। दि. 24 नोव्हेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## तंत्रज्ञान विकासामुळे समाजोन्नती व लोककल्याणाला चालना

# पर्यावरणाचा जागर सोबत मतदानाची शपथ!

### 38 हजार जणांनी एकाच वेळी,एकाच ठिकाणी मतदानाची विक्रमी शपथ घेत मतदानाचा केला निर्धार



**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने आज सुमारे ३८ हजार ३४० जणांनी मतदान करण्याची विक्रमी शपथ घेतली.**

मोशी येथील जगातील सर्वात ~~मोठ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या~~ ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ स्मारकाला मानवंदना देण्यासाठी आज पिंपरी चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, डब्ल्यूटीई फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिव्हर सायक्लोथॉन २०२५' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांमध्ये मतदानाबाबत जागृतीसाठी 'मतदान शपथ' देण्याचा विशेष उपक्रम महापालिकेने स्वीप उपक्रमांतर्गत आयोजित केला होता.

यावेळी आमदार महेश लांडगे, विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांच्यासह महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपआयुक्त शिवाजी पवार, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे,उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ.प्रदीप ठेंगल, माजी नगरसदस्य व माजी नगरसदस्या यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी,कर्मचारी,विविध संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवक यांच्यासह तब्बल ३८ हजार स्पर्धेक, नागरिक या उपक्रमात सहभागी झाले होते.

**मतदानाची विक्रमी शपथ...**

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, " अशी शपथ यावेळी उपस्थितांनी मान्यवरांच्या उपस्थितीत घेतली. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.

> “ राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आगामी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीकरीता स्वीप उपक्रमांतर्गत स्वीप व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे, त्याचाच एक भाग म्हणून आजचा हा मतदान जनजागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. येत्या निवडणुकीत शहरातील सर्व मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा.
>
> **– श्रावण हर्डीकर,** आयुक्त तथा प्रशासक

## तत्कालीन आयुक्त, अतिरिक्त आयुक्तांच्या कारभाराची होणार चौकशी?

### शेखर सिंह, प्रदीप जांभळे बदली झाल्यानंतरही चर्चेत; तक्रारीनंतर शासनाने मागितला अहवाल

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे या दोघांची राज्य शासनाने बदली केली. मात्र, बदलीनंतरही हे दोन्ही अधिकारी आणि त्यांचा कारभार चर्चेचा विषय ठरत आहे. नुकतेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने पिंपरी महापालिकेकडून या दोन्ही अधिकाऱ्यांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल मागितला आहे. महापालिका प्रशासनाकडून हा अहवाल पाठविण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळे तत्कालीन आयुक्त सिंह व अतिरिक्त आयुक्त जांभळे या दोघांच्या कारभाराची चौकशी होणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.**





पिंपरी महापालिकेतील चुकीच्या व भ्रष्ट कारभाराची तक्रार तत्कालीन आयुक्त सिंह व अतिरिक्त आयुक्त जांभळे यांच्या नावासह सनय छत्रपती शासन पक्षाने मुख्यमंत्र्यांकडे केली होती. या तक्रारीची दखल राज्य शासनाने घेतली असून नगरविकास विभागाचे कार्यासन अधिकारी शिवानी चव्हाण यांनी पिंपरी महापालिका आयुक्तांना पत्राव्दारे संबधित तक्रारीच्या अनुषंगाने शासनास अहवाल पाठविण्यास कळविले आहे. या तक्रारीमध्ये मार्च २०२२ पासून सुरु असलेल्या प्रशासकीय राजवटीचा गैरफायदा अधिका-यांनी घेतला. आयुक्त सिंह आणि अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी मोठ्या प्रमाणावर शहराची लूट केली. ज्याप्रमाणे वसई विरार महापालिकेच्या माजी आयुक्तांच्या घरावर ईडीने छापे टाकून भ्रष्टाचारावर प्रहार केला. त्या प्रकारची कारवाई पिंपरी महापालिकेच्या बाबतीत व्हावी. या दोन्ही अधिका-यांची चौकशी करून त्यांना तत्काळ बडतर्फ करून या पालिकेवर होणारे कर्ज थांबवावे, अशी मागणी तक्रारीतून करण्यात आलेली आहे. महापालिकेतून शेखर सिंह व प्रदीप जांभळे या दोघांची बदली झाली आहे. सिंह यांच्यावर नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी शासनाने दिली असून जांभळे त्यांच्या मूळ विभागात रूजू झाले आहेत

#### पाच हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप

या संपूर्ण प्रकरणात मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीत पिंपरी-चिंचवड महापालिकेत पाच हजार कोटीचा भ्रष्टचार झाल्याची माहिती असल्याचाही आरोप केला आहे. अनावश्यक काने काढून एकेकाळी आशिया खंडातील सर्वांत श्रीमंत असलेल्या महापालिकेला कर्जाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवले. त्यासाठी या अधिकाऱ्यांच्या कारभाराची चौकशी आवश्यक असल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केलेले आहे .

### न्यायालयाने राज्य सरकार व निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले

# पिंपरीत आरक्षण मर्यादा 50 टक्क्यांच्या आतच

## निवडणूक वेळेतच होण्यासाठी महापालिकेची दक्षता

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही. याची दक्षता घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला आदेश दिले आहेत. मात्र, राज्यात काही महापालिकांनी ही मर्यादा ओलांडल्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. याबाबत न्यायालयाने राज्य सरकार व निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले आहेत. ज्या ठिकाणी ही मर्यादा ओलांडली आहे, त्या ठिकाणी निवडणुकीला अडथळे येण्याची शक्यता आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त नाही. त्यामुळे निवडणूक वेळेतच होण्याची शक्यता आहे.**



महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी जोरदार तयारी केली आहे. प्रशासनानेदेखील निवडणुकीच्या कामात वेग घेतला आहे. प्रभागरचना अंतिम झाली आहे. प्रभागांमधील आरक्षण सोडत मात्र, महापालिकेमध्ये राजकीय आरक्षण ५० टक्क्यांच्या आत आहे. ज्या ठिकाणी ५० टक्क्यपेक्षा अधिक आरक्षण झाले आहे, तिथे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा परिणाम होऊ शकतो, अशा ठिकाणी राज्य शासनासमोर दोन पर्याय असतील, एक म्हणजे ओबीसी आरक्षणाची टक्केवारी कमी करून एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या आत आणून निवडणुका घेणे किंवा सन २०२२ मधील बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वीच्या परिस्थितीनुसार निवडणुका घेऊ शकतात.

**लोकसंख्येनुसार आरक्षणाची टक्केवारी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसीसाठी २७ टक्के आरक्षण आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समुदायांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण निश्चित होते. महापालिकेमध्ये नगरसेवकांची संख्या १२८ आहे. त्यामुळे अनुसूचित जातीच्या (एससी) २० जागा, अनुसूचित जमातीच्या (एसटी) ३ जागा आणि नागरिकांचा इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी ३४ जागा देण्यात आल्या आहेत, त्यानुसार आरक्षणाची ही मर्यादा ४४.५२ टक्के होते. त्यामध्ये एकूण नगरसेवकांच्या आकडेवारीनुसार ओबीसीसाठी २६.५६ टक्के आरक्षण आहे, तर एससीसाठी १५.६२ व एमटी जागांसाठी २.३४ टक्के आरक्षण देण्यात आले आहे

> पिंपरी-चिंचवड महापालिकेतील १२८ जागांचे आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा जास्त नाही. त्यामुळे महापालिकेला याचा धोका नाही. राज्यातील दोन महापालिका आणि बाकी नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्या ठिकाणी याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.
>
> **सचिन पवार,** उपायुक्त, निवडणूक विभाग, महापालिका

---

### डी.एस.के. कुंजबनमध्ये ‘ट्रॅफिक बडी’ जनजागृती उपक्रम

## वाहतूक सुरक्षा : सोसायटीतील नागरिकांचा प्रतिसाद : वाहतूक पोलिसांसोबत साधला संवाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पुनावळे वाकड येथील सोसायट्यांमध्ये पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय व वाकड वाहतूक विभागाच्या वतीने ‘वाहतूक मित्र’ जागरूकता सत्र राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पोलिस अधिकाऱ्यांकडून रहिवाशांना ‘ट्रॅफिक बडी’ चॅटबॉटचा वापर शिकवण्यात येत आहे.**



पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनच्या पुढाकारातून आतापर्यंत रिदम, वेस्टर्न अव्हेन्यू, अक्षर एलमेंटा, संस्कृती, कल्पतरू हार्मनी अशा सहा सोसायट्यांमध्ये ही सत्रे यशस्वीरीत्या पार पडली आहेत. पोलिसांनी सांगितले की, ‘ट्रॅफिक बडी’ चॅटबॉट सोपा आणि प्रभावी आहे; मोबाईलवरून +९१ ८७८८६४९८८५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर काही सेकंदांत तक्रार दाखल करणे शक्य आहे.

पुनावळे येथील डी.एस.के. कुंजबन सोसायटीत आयोजित कार्यक्रमात वाकड वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुकर थोरात, पोलीस हवालदार कपिल साबळे तसेच पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे उपाध्यक्ष सचिन लोंढे यांनी रहिवाशांना वाहतूक नियमांचे पालन आणि अपघात प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन केले.

सोसायटीचे चेअरमन अधिकराव दिवे-पाटील, सचिव निलेश काळे, उपखजिनदार संजय थोरात, सांस्कृतिक समितीचे उपाध्यक्ष प्रमोद पाटील, कार्यकारी सदस्य यतीन खंडेलवाल आणि श्रीराम पाटील उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान रहिवाशांनी पोलिसांना प्रश्न विचारले आणि शंका निरसन करण्यात आले. अनेक रहिवाशांनी तत्काळ ‘ट्रॅफिक बडी’ चॅटबॉट मोबाईलवर सुरू करून उपक्रमात सहभाग नोंदवला. ताथवडे–पुनावळे परिसरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक सुरक्षिततेबाबत अधिक सतर्क राहण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यकारी समितीच्या सदस्या विद्या जोशी यांनी केले, तर नियोजनामध्ये व्यवस्थापक श्रीधर पन्हाळकर आणि मेहताब मोमीन यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

> “वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचा धोका लक्षणीय कमी होतो. ‘ट्रॅफिक बडी’ चॅटबॉट नागरिकांसाठी खूप सोयीस्कर साधन आहे; मोबाईलवरून काही सेकंदांत तक्रार दाखल करून रस्त्यावरील अडथळे, अपघात किंवा अन्य समस्या पोलिसांकडे पोहोचवता येतात. आम्ही रहिवाशांना या सुविधा वापरण्यास प्रोत्साहित करत आहोत, जेणेकरून वाकड आणि पुनावळे परिसर सुरक्षित राहील.”
>
> **- मधुकर थोरात,** सहाय्यक पोलीस निरीक्षक, वाकड वाहतूक विभाग.

### जपला पर्यावरण जागृतीचा आदर्श!

# आमदारांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण!

## मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे यांच्याकडून वृक्षारोपण

### भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन





। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधान सभेचे लोकप्रिय हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या 50 व्या वाढदिवसानिमित्त प्रभाग आठ भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्राधिकरण सर्कल इंद्रायणी नगर येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे यांच्या पुढाकारातून झालेल्या या वृक्षारोपणाच्या निमित्ताने परिसर प्रदूषण मुक्त आणि हिरवागार करण्याचा संकल्प करण्यात आला.**

भाजपाचेष्ठ नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच निमित्ताने मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे यांच्या पुढाकारातून प्राधिकरण सर्कल, इंद्रायणी नगर प्रभाग क्रमांक आठ येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. कार्यक्रमात कामगार आघाडी प्रदेश सरचिटणीस हनुमंत लांडगे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे, निलम शिवराज लांडगे, जेजुरी देवस्थान विश्वस्त अनिल सौंदडे, नंदकुमार ठाकूर, उत्तम नागरजे, डॉ.आवारी, ढोकले साहेब आदी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विविध प्रकारच्या रोपांचे रोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रभाग आठ भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम पर्यावरणपूरक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला असून परिसर अधिक हिरवाईने नटणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले

> “ पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपाकडून गेल्या काही वर्षांपासून सातत्याने "ग्रीन सोसायटी" मोहीम राबवली जात असून या उपक्रमामुळे इंद्रायणी नगर परिसरात हरित वातावरण निर्मितीस चालना मिळणार आहे
>
> **-शिवराज लांडगे,** मंडल अध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड शहर.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs: Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune